प्रेसनोट दिनांक- 20.03.2026

**"सायबर गुन्हे शाखा, मुंबई यांनी सिमकार्ड विक्रेत्यांमार्फत सिम कार्डचा गैरवापर करून करण्यात आलेल्या फसवणुकीप्रकरणी 05 सिमकार्ड विक्रेत्यांवर गुन्हे दाखल केलेबाबत....**

सायबर गुन्ह्यांमध्ये वापर होत असलेल्या मोबाईल क्रमांकाची माहीती सायबर गुन्हे शाखा, मुंबई यांनी प्राप्त करुन सदरचे मोबाईल क्रमांक हे ज्या सिमकार्ड विक्री एजंटद्वारे विक्री करण्यात आले त्या एजंटचा शोध घेवुन त्यांचेविरोधात सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई या ठिकाणी ०५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सिमकार्ड विक्री एजंट यांनी सिमकार्ड खरेदी करण्याकरिता आलेल्या व्यक्तींच्या आधारकार्डचा गैरवापर करून, त्यांच्या नावावर बनावट व खोट्या स्थानिक पत्त्यांची नोंद सिमकार्ड खरेदी अर्ज (CAF) मध्ये करुन ग्राहकांनी एकच सिमकार्डची मागणी केलेली असताना आरोपीने त्यांच्या परवानगीशिवाय दोन किंवा त्यापेक्षा जास्त सिमकार्ड कार्यरत/चालु केली. त्यापैकी एक सिमकार्ड ग्राहकाला देऊन उर्वरीत सिमकार्ड स्वतःकडे ठेवुन सदर सिमकार्ड सायबर गुन्हे करण्याकरिता पाहीजे आरोपीतांना पुरविले आहेत.

**सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई या ठिकाणी अशा सिमकार्ड विक्री एजंटवर दाखल गुन्ह्याची माहीती खालीलप्रमाणे.**

1. मध्य विभाग सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र- 34/26 कलम 318(4), 336(2), 336(3), 3(5) भा. न्या. सं. 2023 सह कलम 66 ड माहिती व तंत्रज्ञान कायदा 2000
   - सिमकार्ड विक्रेता आरोपी-1) मोहम्मद सुलतान मोहम्मद हनीफ अन्सारी, 10, मोहम्मद उमर रज्जाक रोड, मदनपुरा, मुंबई.
     2) झिशान कामले, रा.ठी- नागपाडा, मुंबई.
2. दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र- 20/2026 कलम 318(4), 336(2), 336(3), 3(5) भा. न्या. सं. 2023 सह कलम 66 ड माहिती व तंत्रज्ञान कायदा 2000
   - सिमकार्ड विक्रेता आरोपी-1) दयाशंकर भगवान शुक्ला, राजेश कम्युनिकेश, कुलाबा, मुंबई
3. पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र- 65/2026 कलम 318(4), 336(2), 336(3) भा. न्या. सं. 2023 सह कलम 66 ड माहिती व तंत्रज्ञान कायदा 2000.
   - सिमकार्ड विक्रेता आरोपी- श्रृष्टी प्रदिपकुमार बरनवाल, 02 जुहु लेन, वायरलेस रोड, अंधेरी प., मुंबई.
4. उत्तर विभाग सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र-73/2026 कलम 318(4), 336(2), 336(3), 3(5) भा. न्या. सं. 2023 सह कलम 66 ड माहिती व तंत्रज्ञान कायदा 2000
   - सिमकार्ड विक्रेता आरोपी- निरज शिवराम पटवा, 1 राजा अपार्टमेंट, प्रगतीनगर, दहीसर, मुंबई.
5. पुर्व विभाग सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र- 51/2026 कलम 318(4), 336(2), 336(3), 3(5) भा. न्या. सं. 2023 सह कलम 66ड माहिती व तंत्रज्ञान कायदा 2000
   - सिमकार्ड विक्रेता आरोपी- गौस मोहीउद्दीन मोहम्मद दस्तगीर, ITAS mobile, चिता कॅम्प ट्रॉम्बे, मुंबई.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे श्री पुरुषोत्तम कराड, मा. सहा.पोलीस आयुक्त(सायबर विभाग), श्री. इरफान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे शाखेतील सर्व वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली आहे.

**<u>नागरिकांना आवाहन:-</u>**

1. आपल्या नावावर किती सिमकार्ड्स सुरू आहेत याची माहीती **Sanchar Saathi** (संचारसाथी) या पोर्टलवर जावुन **Know Mobile connection in your name** या टॅबवर जावुन आपला मोबाईल क्रमांक त्यावर टाकुन पडताळणी करावी. जर एखादा मोबाईल क्रमांक हा आपल्या नावावर असेल आणि आपण वापरत नसाल तर **Not my number** यावर क्लिक करुन रिपोर्ट करावे.